**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य खंडपीठ, छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 च्या कलम 18 अन्वये दाखल तक्रार**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-431001

| बोर्ड क्रमांक : 35 | तक्रार क्रमांक 08/2023 (द्वितीय अपील क्रमांक :- 7693/2021 व 12071/2021 ) |
|---|---|

| अक्र. | तपशिल | |
|---|---|---|
| 1 | श्री. रोहित कन्हैया रानडे,<br>रा. कुंभारवाडा औरंगपूरा, गुलमंडीजवळ, ता.जि.छत्रपती संभाजीनगर | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | |
| 1 | तहसिलदार,<br>तहसिल कार्यालय,खुलताबाद जि.छत्रपती संभाजीनगर | उत्तरवादी क्र. 1 |
| 2 | उपविभागीय अधिकारी,<br>उपविभागीय अधिकारी कार्यालय,कन्नड जि.छत्रपती संभाजीनगर | उत्तरवादी क्र. 2 |

**(सुनावणी दिनांक 27.06.2024)**

तक्रारदार यांनी दिनांक 24.01.2023 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,2005 चे कलम 18 नुसार तक्रार अर्ज दाखल केलेला आहे.

आयोगामध्ये दाखल केलेल्या द्वितीय अपील क्रमांक 7693/2021 व 12071/2021 यावर आयोगाने दिनांक 21.10.2022 रोजी सुनावणी घेवून पारीत केलेल्या आदेशानुसार विहित मुदतीत कार्यवाही न झाल्यामुळे योग्य तो न्याय देण्यात यावा, अशी विनंती तक्रारदार यांनी आयोगाकडे केलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात द्वितीय अपील क्रमांक 7693/2021 व 12071/2021 यामध्ये आयोगाने दिनांक 21.10.2022 रोजी सुनावणी घेवून तक्रारदार यांचे दोन्हीही द्वितीय अपील मंजूर करुन खालील प्रमाणे आदेश पारीत केलेले आहेत.

" 2. तहसिलदार, खुलताबाद जि.औरंगाबाद यांनी हे आदेश प्राप्त होताच चार आठवडयाच्या आत वर नमुद परिच्छेद क्रमांक 1 मध्ये आयोगाने निर्देश दिल्याप्रमाणे कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवाल जिल्हाधिकारी,औरंगाबाद यांचेकडे तात्काळ सादर करावा. 3. उपविभागीय अधिकारी, उपविभागीय अधिकारी कार्यालय, कन्नड जि.औरंगाबाद यांनी हे आदेश प्राप्त होताच चार आठवडयाच्या आत वर नमुद परिच्छेद क्रमांक 2 मध्ये आयोगाने निर्देश दिल्याप्रमाणे कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवाल जिल्हाधिकारी,औरंगाबाद यांचेकडे तात्काळ सादर करावा.

त्यानुसार सदर तक्रार प्रकरणात आयोगामध्ये दिनांक 27.06.2024 रोजी सुनावणी निश्चित करण्यात आली होती. सदर सुनावणीस तक्रारदार स्वत: उपस्थित होते. तसेच तहसिलदार,खुलताबाद व उपविभागीय अधिकारी,कन्नड हे उपस्थित होते.

तक्रारदार यांनी सुनावणीच्या वेळेस आयोगासमोर कथन केले की, आयोगाने दिलेल्या आदेशानुसार अद्यापर्यंत कार्यवाही झालेली नाही.

तहसिलदार,खुलताबाद यांनी सुनावणीच्या वेळेस आयोगासमोर कथन केले की, आयोगाने दिलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात आलेली आहे, सदर प्रकरणात अभिलेख उपलब्ध न झाल्यामुळे संबंधीत कर्मचा-याविरुध्द महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम,2005 च्या कलम 9 नुसार फौजदारी गुन्हा दाखल करण्याची कारवाई करण्यात आली आहे.

उपविभागीय अधिकारी, कन्नड यांनी सुनावणीच्या वेळेस आयोगासमोर कथन केले की, आयोगाने दिलेल्या आदेशाचे अनुषंगाने अधिनियमातील तरतुदीनुसार आवश्यक कार्यवाही करण्यात आली आली असून याबाबत प्रस्तुत प्रकरणातील तक्रारदार यांना प्रकरणातील सर्व वस्तुस्थिती दिनांक 25.08.2023 रोजीच्या पत्राद्वारे कळविण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात द्वितीय अपील क्रमांक 7693/2021 व 12071/2021 यामध्ये आयोगाने दिनांक 21.10.2022 रोजी दिलेल्या आदेशाचे अनुषंगाने तहसिलदार, खुल्ताबाद आवश्यक कार्यवाही केलेली आहे. याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आयोगास दिनांक 16.05.2024 रोजीच्या पत्राद्वारे सादर केलेला आहे.

तसेच उपविभागीय अधिकारी,कन्नड यांनी आयोगाने दिलेल्या आदेशाचे अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करुन प्रकरणातील वस्तुस्थिती तक्रारदार यांना कळविण्यात आल्याचे दिसून येते याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दिनांक 26.06.2024 रोजीच्या पत्राद्वारे आयोगास सादर केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात तहसिलदार,खुल्ताबाद जि. छत्रपती संभाजीनगर व उपविभागीय अधिकारी,कन्नड जि.छत्रपती संभाजीनगर यांनी आयोगाने दिलेल्या आदेशानुसार कार्यवाही केलेली असल्यामुळे तक्रारदार यांनी त्यांचे तक्रारअर्जामध्ये उपस्थित केलेल्या मुद्यांमध्ये तथ्यांश नसल्यामुळे तक्रारदार यांचा तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहेत.

**आदेश**

तक्रारदार यांचा तक्रार अर्ज अंतिमत: निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

राज्य माहिती आयोग खंडपीठ छत्रपती संभाजीनगर सत्यमेव जयते

---

जावक क्र. द्वितीय अपील क्र. 7693/2021 व 12071/2021 / डी / 11175 दि. 2/07/2024